**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. नामदेव शामराव नालंदे
व्हिल कॉलनी, बारामती,
ता. बारामती, जि. पुणे

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
विस्तार अधिकारी (पंचायत)
पंचायत समिती, बारामती, जि. पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
ग्रामविकास अधिकारी, जळोची,
ता. बारामती, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४०२ / पुणे |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | ११.८.२००६ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | १९.८.२००६ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | १२.९.२००६ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | १६.९.२००६ |
| ६ | <u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u><br><br>पंचायतीचा वार्षिक अहवाल, पंचायतीने केलेली विकास कामे व बिल्डिंगची बांधकामे याबाबत | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. नामदेव शामराव नालंदे यांनी ग्रामपंचायत जळोची, ता. बारामती, जि. पुणे या कार्यालयाशी निगडीत एकूण ५ मुद्दयांची माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत जळोची, ता. बारामती जि.पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत) पंचायत समिती, बारामती, जि.पुणे यांच्याकडील प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने श्री. नालंदे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे.

आयोगाकडे प्राप्त झालेल्या अपिलांच्या अनुषंगाने आयोगाने दि. २७.११.२००६ रोजीच्या पत्रान्वये सर्व संबंधितांना अपिलाच्या सद्यस्थितीबाबत विचारणा केली होती. आपल्याला आवश्यक ती माहिती शुल्क न भरता मिळाल्याने अपील निकाली काढण्याबाबत अपीलकर्ता श्री. नालंदे यांनी दि. १८.१२.२००७ रोजीच्या पत्रान्वये आयोगाला कळविले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २७.०२.२००८**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ, पुणे**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. शौकत इकबाल मुल्ला
मु.पो. कारंदवाडी, ता. वाळवा, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार वाळवा ,
तहसील कार्यालय, वाळवा-इस्लामपूर,
जि. सांगली

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
निवासी नायब तहसीलदार, वाळवा,
इस्लामपूर, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४२६ / सांगली |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | १९.१०.२००६ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | १४.११.२००६ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | २३.११.२००६ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>अपंग व्यक्तींचे नोकरी देऊन पुनर्वसन करण्याबाबत | |

## विवेचन

अपंग व्यक्तीस नोकरी देऊन पुनर्वसन करण्यासंबंधातील माहिती अपीलकर्ता श्री. शौकत इकबाल मुल्ला यांनी मागितली होती. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्याकडील माहितीने समाधान न झाल्याने श्री.मुल्ला यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगाकडे प्राप्त झालेल्या अपिलांच्या अनुषंगाने आयोगाने दि. २७.११.२००७ रोजीच्या पत्राने सर्व संबंधितांना विचारणा केली होती. जिल्हा परिषद, सांगली येथे शिपाई या पदावर नोकरी मिळाल्याने आपले अपील निकाली काढावे, असे अपीलकर्त्याने आयोगास दि. १४.१.२००८ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २७.२.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. संजय शंकरराव पुप्पाल
१३७, मोदीखाना, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
सहाय्यक आयुक्त (स)
सोलापूर, महानगरपालिका, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
सहाय्यक संचालक, नगर रचना,
सोलापूर, महानगरपालिका, सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा
प्रभारी नगर अभियंता,
सोलापूर, महानगरपालिका, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४७+४९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९.९.२००७ |

३. **उपस्थित**

अपीलकर्ता श्री. संजय शंकरराव पुप्पाल, १३७, मोदीखाना, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त (स) सोलापूर, महानगरपालिका, सोलापूर (तत्कालीन श्री. ए.एस.विपत), विद्यमान श्री. पी. वाय. बिराजदार

**जन माहिती अधिकारी** तथा प्रभारी सहाय्यक संचालक, नगर रचना, सोलापूर, महानगरपालिका, सोलापूर श्री. द.नि. पवार

**जन माहिती अधिकारी** तथा प्रभारी नगर अभियंता, सोलापूर, महानगरपालिका, सोलापूर श्री. गंगाधर म. दुलंगे

| अपील क्रमांक | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| ४७ / सोलापूर | दि. १.३.२००६ | दि. १४.३.२००६ | दि. २३.५.२००६ | दि. -- |
| ४९ / सोलापूर | दि. ४.१.२००६ | दि. -- | दि. २३.५.२००६ | दि. २२.६.२००६ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

घ.नं. १३७, सि.स.नं.६६० मध्ये बांधकाम परवाना हा २००० साली कोणी व कशाचे आधारे दिला याचा खुलासा व सदरचा बांधकाम परवाना घेताना जी काही कागदपत्रे देण्यात आली ती सर्व कागदपत्रे व बांधकाम परवाना मजूंर केला आहे त्याबाबतचा खुलासा

## विवेचन

आपल्या घराशेजारील बांधकामाला बेकायदेशीरपणे परवानगी कशी मिळाली व आपल्या जागेत या मिळकतदाराने केलेली वहिवाट बंद करावी, व त्या अनुषंगाने कागदपत्रांची मागणी अपीलकर्ता श्री. संजय शंकरराव पुप्पाल यांनी जन माहिती अधिकारी तथा प्रभारी सहाय्यक संचालक, नगररचना, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांच्याकडे केली होती. माहिती अन्य विभागाशी संबंधित असल्यामुळे त्या खात्याकडून माहिती मागविली असून प्राप्त होताच उत्तर पाठविण्यात येईल,

असे जन माहिती अधिकाऱ्यांनी श्री. पुप्पाल यांना कळविले. आपल्याला अडीच महिन्यांनी माहिती मिळाली व ती अर्धवट व दिशाभूल करणारी आहे या कारणावरून श्री. पुप्पाल यांनी अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (स), सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांच्याकडे अपील केले. श्री. पुप्पाल यांना संचिका दाखवून त्यांना हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती योग्य ते शुल्क आकारुन जन माहिती अधिकाऱ्यांनी २० दिवसात उपलब्ध करुन द्याव्यात, असा निर्णय अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (स), सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांनी दिला. त्याविरुध्द श्री. पुप्पाल यांनी राज्य माहिती आयोगाकडे दोन अपिले केली आहेत.

सोलापूर मधील सिटी सर्व्हे क्र.६६० या जागेच्या संदर्भातील हा विषय आहे. आपल्या वाट्याला कमी क्षेत्र दाखविण्यात आले असल्याचे श्री. पुप्पाल यांचे म्हणणे असून त्या संदर्भात ते सातत्याने विविध अधिकाऱ्यांकडे अर्ज करीत आले आहेत. त्या संदर्भातील दावा न्यायालयात दाखल आहे. श्री. पुप्पाल यांनी या संदर्भात जवळ जवळ ६० ते ७० तक्रार अर्ज व १० माहिती अधिकाऱ्यांकडे अर्ज केले आहेत, असे जन माहिती अधिकारी तथा प्रभारी सहाय्यक संचालक, नगररचना, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर श्री. द.नि.पवार व तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (स), सोलापूर महानगरपालिका, सोलापूर श्री. अनिल विपत यांनी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

याच विषयाच्या संदर्भात श्री. पुप्पाल यांनी राज्य मुख्य माहिती आयुक्त, डॉ. सुरेश वि. जोशी यांच्याकडे केलेल्या अपिलांचा निकाल त्यांनी दि. ६.२.२००७ रोजी दिला आहे. त्यामध्ये 'अर्जदाराचे म्हणणे असे की, जी रक्कम कळविण्यात आलेली आहे ती सर्टिफाईड कॉपीजची आहे व त्यांना नुसत्या झेरॉक्स प्रती पाहिजेत. जर अर्जदारास झेरॉक्स प्रतीच पाहिजे असतील तर त्यांना प्रमाणित नसलेल्या नुसत्या झेरॉक्स प्रती देण्यात याव्यात. त्यासाठी नकाशे वगैरेच्या झेरॉक्स प्रती काढण्यासाठी आलेला प्रत्यक्ष खर्च त्यांच्याकडून घेण्यात यावा व इतर कागदपत्रांसाठी महाराष्ट्र शासनाच्या नियमाप्रमाणे प्रती पेज रु.२/- प्रमाणे चार्जेस महापालिकेने आकारुन माहिती देण्यात यावी. त्याप्रमाणे महापालिकेने मान्य केले व अर्जदारानेही त्यामुळे समाधान होईल असे सांगितले,' असा निर्णय देऊन राज्य मुख्य माहिती आयुक्तांनी अपील निकाली काढले आहे. याच विषयाच्या संदर्भातील त्याच मागणीसाठी श्री. पुप्पाल यांनी केलेली ही अपिले आहेत.

श्री. पुप्पाल यांनी विस्तृत प्रमाणावर निवेदन व कागदपत्रे सादर केली आहेत. परंतु त्यात मुख्यतः भाष्य व कारवाईची मागणी यांचा समावेश आहे. डॉ. सुरेश जोशी यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे आपण प्रती मागण्यासाठी गेलो असताना आपल्याला त्या देण्यात आल्या नाहीत, तसे पत्र आपण दिले आहे, असे श्री. पुप्पाल यांनी सांगितले. दि. १६.३.२००७ रोजी श्री. पुप्पाल यांना कागदपत्रे पाहणीबाबत व शुल्काबाबत पत्र पाठविले होते, परंतु ते आले नाहीत व त्यांनी शुल्क भरले नाही. त्यामुळे त्यांना अपेक्षित असलेल्या कागदपत्रांच्या प्रती देता आल्या नाहीत, असे जन माहिती अधिकारी श्री. द. नि. पवार यांनी सांगितले.

सुनावणीच्या दिवशीच दुपारी ४.३० ते ५.३० या काळात नगर अभियंता कार्यालयात श्री. पुप्पाल यांना विषयांकित संचिकेची पाहणी करु द्यावी व त्यांना आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या व नकाशांच्या नकला राज्य मुख्य माहिती आयुक्त यांच्या आदेशात नमूद केलेप्रमाणे शुल्क घेऊन द्याव्यात, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता. तशी कार्यवाही केली जात असल्याचे जन माहिती अधिकारी तथा प्रभारी सहाय्यक संचालक, नगररचना, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर श्री. द. नि. पवार यांनी दि. २९.९.२००७ च्या (प्राप्त दि.१.१०.२००७) च्या पत्रान्वये आयोगाला कळविले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील अमान्य.

२. अपीलकर्त्यास संबंधित नस्ती पाहणीसाठी उपलब्ध करुन देऊन आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती योग्य ते शुल्क आकारुन देण्यात याव्यात. आयोगाने दिलेल्या आदेशाच्या पूर्ततेचा अहवाल जन माहिती अधिकाऱ्यांनी दि. १०.३.२००८ पर्यंत आयोगाला सादर करावा.

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र — पुणे)

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २७.२.२००८**

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. राजेश तानाजीराव मदने
११७/१३४, उमानगर, मुरारजी पेठ,
सोलापूर - ४१३ ००२

अपीलकर्ता

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
सहाय्यक आयुक्त (स)
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
सार्वजनिक आरोग्य अभियंता,
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४८/ सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९.९.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. राजेश तानाजीराव मदने, ११७/१३४, उमानगर, मुरारजी पेठ, सोलापूर - ४१३ ००२

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त (स), सोलापूर महानगरपालिका, सोलापूर
श्री. अे.एस.विपत, श्री. पी. वाय. बिराजदार

**सहाय्यक जन माहिती अधिकारी** तथा सार्वजनिक आरोग्य अभियंता,
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर श्री. एस. डी. माईनहळ्ळीकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २९.४.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ६.६.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २८.६.२००६ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

फायनल प्लॉट ११७, उमा नगर, येथे मुख्य जलवाहिनीवरुन किती ग्राहकांना नळ कनेक्शन दिले आहेत, यासाठी काय निकष लावण्यात आले, नळाला पाणी न येण्याची लेखी तक्रार दिल्यानंतर किती दिवसात या तक्रारीचे निवारण करण्यात येते, याबाबतचा तपशील व पाणी न येणाऱ्या कालावधीमध्ये वार्षिक पाणीपट्टी बिलामध्ये सवलत मिळते का याची माहिती

## विवेचन

अपीलकर्ता श्री. राजेश तानाजीराव मदने यांनी जन माहिती अधिकारी तथा सार्वजनिक आरोग्य अभियंता, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांच्याकडे पाणी पुरवठ्याच्या संबंधात माहिती मागितली होती. विहित मुदतीत जन माहिती अधिकारी अधिकाऱ्यांनी उत्तर दिले नाही, म्हणून श्री. मदने यांनी अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (स), सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांच्याकडे अपील केले. श्री. मदने यांना हवी असलेली माहिती तत्काळ, विनामूल्य देण्यात यावी असा निर्णय अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिला. त्यानंतर म्हणजे विहित मुदतीपेक्षा ४० दिवस उशिरा माहिती मिळाली व तीही अपुरी व चुकीची आहे, या कारणावरून श्री. मदने यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री. मदने यांनी दि. २९.४.२००६ रोजी अर्ज केला होता. चार विभागांकडून माहिती घेऊन द्यावयाची असल्यामुळे सर्व विभागांना कळवून माहिती देण्यास उशीर लागला, असे तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (स) श्री. अनिल विपत व विद्यमान अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (स) श्री. पी. वाय. बिराजदार, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांनी सांगितले. माहिती मागणाऱ्या अर्जाच्या दरम्यान श्री. मदने यांनी आपल्याकडे नळाला पाणी येत

नसल्याची तक्रार केली होती व नळ दुरुस्त होऊन पाणी येत असल्याचे पत्र त्यांना दिले होते. त्यामुळे मूळ तक्रारीचे निवारण झाले असल्यामुळे माहिती मागणाऱ्या अर्जाला उत्तर दिले गेले नाही, असे सहाय्यक माहिती अधिकारी तथा सार्वजनिक आरोग्य अभियंता, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर श्री. एस. डी. माईनहळ्ळीकर यांनी नमूद केले. महानगरपालिका हे एकच प्राधिकरण असताना पाणी न येणे हे आपल्या विभागाशी संबंधित नसल्याचे उत्तर जन माहिती अधिकारी कसे देऊ शकतात, असा मुद्दा श्री. मदने यांनी उपस्थित केला.

प्रशासकीय जबाबदारी व माहितीच्या अधिकाराच्या कायद्यानुसार जन माहिती अधिकारी म्हणून येणारी जबाबदारी यात तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यांची गल्लत झाल्याचे दिसते. तसेच चार विभागांकडून माहिती घ्यावयाची असली तरी प्रत्यक्षात ती सर्व माहिती एकाच पानाची आहे, हे लक्षात घेता संबंधित यंत्रणेने तत्परतेने व विहित मुदतीत पूर्तता केलेली नाही, हे स्पष्ट होते.

आपणही एका सार्वजनिक प्राधिकरणात जन माहिती अधिकारी असून जन माहिती अधिकाऱ्यांना येणाऱ्या अडचणींची आपल्याला कल्पना आहे, त्यामुळे शास्तीसह कोणतीही कारवाई करण्याची आपली मागणी नाही. किंबहुना अशी कोणतीही कारवाई करू नये, अशी आपली विनंती आहे, असे श्री. मदने यांनी स्पष्ट केले. मात्र पाणी पुरवठ्याबाबत योग्य ती सेवा न देणे, पाणीपट्टीची बिले जादा येणे वगैरे स्वरूपाचा त्रास नागरिकांना दिला जातो तो दिला जाऊ नये, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपीलकर्त्याचे निवेदन लक्षात घेता माहिती देण्यास झालेला विलंब जन माहिती अधिकाऱ्यांना क्षमापित करून अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. प्रथम अपिलाची दखल घेऊन विहित मुदतीत निर्णय देणे हे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार बंधनकारक असताना तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (स) श्री. अनिल विपत यांनी ते केलेले नाही, याबद्दल त्यांना समज देण्यात येत आहे. प्रथम अपिलाचा

निर्णय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील बंधनकारक मुदतीत दिला गेला पाहिजे. याची जाणीव त्यांना करून देण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ, पुणे

पुणे
दि. २७.२.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. वैभव बब्रुवाहन साळुंखे
द्वारा विजय नरसिंह कुलकर्णी,
'यश', कोर्टाच्या पश्चिम बाजूस, कोंडवाड्यालगत,
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
गट विकास अधिकारी (वर्ग-१),
पंचायत समिती, बार्शी, ता. बार्शी
जि. सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
कक्ष अधिकारी, पंचायत समिती, बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४९२ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८.९.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. वैभव बब्रुवाहन साळुंखे, द्वारा विजय नरसिंह कुलकर्णी,
यश, कोर्टाच्या पश्चिम बाजूस, कोंडवाड्यालगत,
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी (वर्ग-१), पंचायत समिती, बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर श्री. विकास दा. दांगट

**जन माहिती अधिकारी** तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर श्री. यू. एस. कळसे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | ३.४.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | २६.४.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | २०.६.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | २६.४.२००६ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

गटविकास अधिकारी कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या अधिकाऱ्यांची संख्या, केंद्रिय माहितीचा अधिकार सन २००५ च्या कायद्याचे कलम ४ चे प्रसिध्दीकरण केलेल्या वा न केलेल्या अधिकाऱ्याचे नाव, कार्यालयाचा पत्ता, प्रसिध्दी दिनांक, तसेच प्रसिध्दीकरण न केलेल्या अधिकाऱ्यांवर केलेल्या कारवाईची माहिती, कारवाई केली नसल्यास का केली नाही याची माहिती

## विवेचन

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४ च्या तरतुदीनुसार बार्शी तालुक्यात गट विकास अधिकारी कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या आस्थापनांबाबतची माहिती अपीलकर्ता श्री. वैभव बब्रुवाहन साळुंखे यांनी मागितली होती. कलम ४ अन्वये १५ अधिकाऱ्यांकडील माहिती प्रसिध्द केली नसल्याचे व अन्य ठिकाणची माहिती त्या त्या कार्यालयाकडे केव्हाही पाहण्यास उपलब्ध असल्याचे गट विकास अधिकाऱ्यांनी कळविले. जन माहिती अधिकाऱ्यांकडे केलेल्या अर्जाचे उत्तर अपिलीय प्राधिकारी असलेल्या गट विकास अधिकाऱ्यांनी दिल्यामुळे श्री. साळुंखे यांनी प्रथम अपील न करता राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४ च्या अनुषंगाने प्रसिध्दीकरण न केलेल्या अधिकाऱ्यांचे नाव, पत्ता, प्रसिध्दीकरण न करण्याची कारणे याबाबतची सविस्तर माहिती अपीलकर्ता श्री. साळुंखे यांनी मागितली होती. परंतु गट विकास अधिकाऱ्यांनी केवळ अधिकाऱ्यांची पदनामे व गावांची नावे एवढाच तपशील दिला. तसेच माहिती व्यक्तिशः घेणार असल्याचे नमूद केले असताना टपालाने व शुल्क न आकारता माहिती पाठविली, असे श्री. साळुंखे यांनी आयोगाकडे केलेल्या अपिलात म्हटले आहे.

माहिती अधिकार कायद्याची अंमलबजावणी सुरु झाल्याच्या प्रारंभीचा काळ असल्यामुळे व प्रशिक्षण झालेले नसल्यामुळे अपिलीय प्राधिकारी असलेले गट विकास अधिकारी यांच्या स्वाक्षरीने

माहिती दिली गेली. एकाच पानाची माहिती होती म्हणून विनामूल्य दिली, असे जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती श्री. यू. एस. कळसे यांनी नमूद केले. तत्कालीन गट विकास अधिकारी श्रीमती अे.डी. ईटाई यांना भेटूनही आपण संपूर्ण तपशील न मिळाल्याचे व अन्य ठिकाणी कलम ४ नुसार स्वयंस्फूर्तीने प्रसिध्दीकरण झाले नसल्याचे सांगितले होते. परंतु पुरेशा गांभीर्याने त्याची दखल घेतली गेली नाही, असे प्रतिपादन श्री. साळुंखे यांनी प्राधिकृत केलेले प्रतिनिधी श्री. विजय नरसिंह कुलकर्णी यांनी केले. १३० ग्रामपचांयतींनी माहिती जाहीर केली असल्याचे विद्यमान अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बार्शी श्री. विकास दा. दांगट यांनी सांगितले.

अद्यापही माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४ नुसार स्वंयस्फूर्तीने माहितीचे प्रसिध्दीकरण न करणाऱ्या संबंधित १५ अधिकाऱ्यांनी दि. १०.१०.२००७ पर्यंत पूर्तता न केल्यास त्यांच्यावर कारवाई केली जाईल, असे आयोगाने गट विकास अधिकाऱ्यांना बजावले.

त्यानुसार गट विकास अधिकारी श्री. विकास दा. दांगट यांनी खालील अधिकाऱ्यांना सूचना देऊन त्यांच्या खुलाशासह पूर्तता अहवाल आयोगाला दि. २०.१०.२००७ च्या पत्रान्वये (प्राप्त दि. ७.११.२००७ ) सादर केले आहेत.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | प्रसिध्दीकरणाचा दिनांक |
|---|---|---|
| १. | गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, बार्शी | दि. २९.९.२००७ |
| २. | उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा,उपविभाग बार्शी | दि. सप्टेंबर २००७ |
| ३. | बाल विकास प्रकल्प अधिकारी, बार्शी | दि. सप्टेंबर २००७ |
| ४. | वैद्यकीय अधिकारी, प्रा. आ. केंद्र बार्शी | दि. २९.९.२००७ |
| ५. | वैद्यकीय अधिकारी, प्रा. आ. केंद्र आगळगाव,ता. बार्शी | -- |
| ६. | वैद्यकीय अधिकारी, प्रा. आ. केंद्र पानगाव, ता. बार्शी | -- |
| ७. | वैद्यकीय अधिकारी, प्रा. आ. केंद्र वैराग, ता. बार्शी | -- |
| ८. | वैद्यकीय अधिकारी, प्रा. आ. केंद्र चिखर्डे, ता. बार्शी | -- |
| ९. | वैद्यकीय अधिकारी, प्रा. आ. केंद्र उपळे (दु), ता. बार्शी | -- |
| १०. | वैद्यकीय अधिकारी, प्रा. आ. केंद्र तडवळे, ता. बार्शी | -- |
| ११. | वैद्यकीय अधिकारी, प्रा. आ. केंद्र गोडगांव, ता. बार्शी | -- |
| १२. | पशुधन विकास अधिकारी, बार्शी | -- |
| १३. | पशुधन विकास अधिकारी, वैराग | -- |
| १४. | पशुधन विकास अधिकारी, पांगरी | -- |
| १५. | पशुधन विकास अधिकारी, उपळे (दु) | -- |
| १६. | पशधन विकास अधिकारी, जवळगांव | -- |

उपरोक्त अधिकाऱ्यांनी त्यांच्या अहवालात 'अनवधानाने चूक झाली, क्षमा मागतो, यापुढे अशी चूक होणार नाही, याची दक्षता घेऊ' अशा एकाच छापाचे सर्व खुलासे दिले आहेत. विलंबाचे कोणतेही नेमके स्पष्टीकरण एकाही खुलाशात नमूद केलेले नाही. याबाबत संबंधितांना कडक समज देण्यात येत आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ४ मधील तरतुदींनुसार स्वयंस्फूर्तीने माहिती जाहीर करण्यासाठी वास्तविक कायद्यानेच १२० दिवसांची मुदत घालून दिलेली आहे. परंतु कायदा अंमलात आल्याला दोन वर्षे होत आली, तरी त्यानुसार कार्यवाही अनेक सरकारी आस्थापना करीत नाहीत, ही अत्यंत गंभीर बाब आहे. हे कायद्याचे उल्लंघन आहे, तसेच नागरिकांच्या दृष्टीने गैरसोय निर्माण करणारे आहे. श्री. साळुंखे / श्री. कुलकर्णी यांच्यासारख्या जागरुक नागरिकांनी आयोगाचे याकडे लक्ष वेधणे प्रसंशनीय असले तरी संबंधित आस्थापनेच्या प्रशासकीय प्रमुखांच्या दृष्टीने ही बाब भूषणावह नाही.

केवळ बार्शी तालुक्यापुरताच व पंचायत समिती / जिल्हा परिषद यांच्यापुरताच हा प्रश्न मर्यादित नसून अन्य सर्व विभागांमधील सर्व सार्वजनिक प्राधिकरणांच्या प्रशासकीय प्रमुखांनी याची दखल घेऊन तात्काळ कार्यवाही करणे आवश्यक आहे. अन्यथा कायद्याचे उल्लंघन केल्याबद्दल संबंधित प्रशासकीय प्रमुखांवर योग्य ती कारवाई करणे आयोगाला अपरिहार्य ठरेल.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

१. अपील अंशतः मान्य.

२. उपरोक्त १५ अधिकाऱ्यांना कायद्याची योग्य व विहित मुदतीनुसार अंमलबजावणी करण्याची समज देण्यात येत आहे. या सर्व अधिकाऱ्यांच्या गोपनीय अहवालात व सेवापुस्तकात याची नोंद करावी, व आयोगाला दि. १५.३.२००८ पर्यंत अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकाऱ्यांनी पूर्तता अहवाल सादर करावा.

३. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४ मधील तरतुदींनुसार स्वयंस्फूर्तीने माहिती जाहीर करण्याची कार्यवाही अनेक सरकारी आस्थापना करीत नाहीत, ही अत्यंत गंभीर बाब असून हे कायद्याचे उल्लंघन आहे. याची नोंद घेऊन सर्व विभागांच्या प्रशासकीय प्रमुखांनी योग्य ती कार्यवाही करावी. किती आस्थापनांनी स्वयंस्फूर्तीने माहिती जाहीर केली आहे. किती आस्थापनांनी अशी माहिती जाहीर केलेली नाही, त्याची कारणे, संबंधित प्रशासकीय प्रमुखांनी त्याबाबत केलेली कारवाई या संपूर्ण तपशिलाचा समावेश अहवालात आवश्यक आहे. त्यासंबंधीचा पूर्तता अहवाल संबंधीत प्रशासकीय प्रमुखांनी दि. २५.३.२००८ पर्यंत आयोगाला सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**पुणे**
**दि. २७.२.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. गंगाधर बसलिंगप्पा शेटे
२०, सोमवार पेठ, शेटेवाडा, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
प्रभारी सहाय्यक आयुक्त (स),
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर — उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
प्रभारी नगर अभियंता,
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८.९.२००७ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. गंगाधर बसलिंगप्पा शेटे, २०, सोमवार पेठ, शेटेवाडा, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रभारी सहाय्यक आयुक्त (स),
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर श्री. पी. वाय. बिराजदार

**जन माहिती अधिकारी** तथा प्रभारी नगर अभियंता,
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर श्री. गंगाधर म. दुलंगे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८.३.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २.५.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २६.४.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ५.५.२००६ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

सोमवार पेठ घर नं. २३ सि.स.नं.५५१५ मध्ये केलेल्या बांधकामाचा प्लॅन मंजूर नाही, वापर परवानगी दिलेली नाही, त्यामुळे त्याबाबत कायदेशीर कारवाई काय केली व किती नोटिसा बजावण्यात आल्या आहेत याबाबत सविस्तर माहिती. सोमवार पेठ घर नं. २२ सि.स.नं.५५१४ मध्ये अतिक्रमण करुन बांधकाम केलेले आहे. त्याबाबत काय कारवाई केली व अतिक्रमण करुन केलेले बांधकाम केव्हा पाडण्यात येणार याबाबत खुलासा, छोटे बिगर परवाना बांधकाम ताबडतोब पाडले जाते, तर मोठे बांधकाम का पाडण्यात आले नाही याचा खुलासा

## विवेचन

बेकायदेशीर बांधकामाबाबतच्या कारवाईविषयीची माहिती अपीलकर्ता श्री. गंगाधर बसप्पा शेटे यांनी जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी पंधरा दिवस उशिरा माहिती दिली. योग्य माहिती न मिळाल्याच्या कारणावरुन श्री. शेटे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (स), सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांच्याकडे अपील केले. अपीलकर्ता श्री. शेटे व त्यांची तक्रार असलेले शेजारचे बांधकाम करणारे श्री. रमेश विश्वनाथ उत्तरकर या दोघांनी जागेची मोजणी करुन घेऊन त्याची सनद महानगरपालिकेकडे सादर करावी, त्यानंतर बांधकाम परवानगीबाबतचा निर्णय घेण्यात येईल, असा प्रशासकीय आदेश तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (स), सोलापूर महानगरपालिका, सोलापूर श्री. अनिल विपत यांनी दिला. आपण मागितलेल्या माहितीबाबत कारवाई झाली नाही व माहिती मिळाली नाही, म्हणून श्री. शेटे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

हा प्रशासकीय कार्यवाहीचा विषय आहे, त्यासंबंधी अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (स), सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांनी प्रशासकीय आदेश प्रथम अपिलात दिले आहेत. मात्र संबंधित बांधकामाबाबत दाखल केलेल्या नकाशात त्रुटी असल्यामुळे बांधकाम परवानगी देण्यात आली नाही, फेर नकाशा दाखल असल्यामुळे नोटिसा बजावण्यात आलेल्या नाही व कारवाई करण्यात आलेली नाही, असे जन माहिती अधिकाऱ्यांनी उत्तरात नमूद केले आहे. बांधकाम बेकायदेशीर आहे का, परवानगी नसताना ते केले गेले का, त्याबाबत काय कारवाई केली गेली, या

मुद्दयांबाबत जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेल्या उत्तरात अप्रत्यक्षपणे अपीलकर्त्यांच्या तक्रारीला दुजोरा मिळतो, असे दिसते.

नकाशा मंजूर नसताना दुमजली बांधकाम केले गेले त्याबाबत वारंवार तक्रार करुनही कारवाई झालेली नाही, ती का झालेली नाही व अतिक्रमण करुन केलेले बांधकाम केव्हा पाडणार, असा श्री. शेटे यांच्या अर्जातील मुख्य विषय आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये खुलासे, स्पष्टीकरण, कार्यवाही यांची मागणी करता येणार नाही. मात्र श्री. शेटे यांना संबंधित विषयाबाबतच्या कार्यवाहीच्या संदर्भातील नेमकी माहिती दिली जाणे आवश्यक आहे.

संबंधित विषयाबाबत माहिती असलेल्या कर्मचाऱ्याची बदली झाली, त्याचा अतिरिक्त कार्यभार अन्य कर्मचाऱ्याकडे देण्यात आला व नंतर त्याचीही बदली झाली. या कारणामुळे ३० दिवसांच्या मुदतीत मूळ अर्जाला उत्तर देता आले नाही, पंधरा दिवस विलंब झाला, असा खुलासा जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर श्री. गंगाधर म. दुलंगे यांनी लेखी व तोंडी केला, तो मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील अमान्य.

२. संदर्भित बांधकामाच्या कायदेशीर स्थितीबाबतची व त्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबतची नेमकी माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकर्त्यास नि:शुल्क द्यावी. दि.५.३.२००८ पर्यंत याबाबतचा पूर्तता अहवाल आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. १६.२.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, ( पुणे विभाग), यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. जाविद गणी बागवान
रा. ६२५४/अ, बुधवार पेठ, छत्रे तालीम गल्ली, — अपीलकर्ता
मिरज, जि. सांगली

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सांगली — उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
जनरल मॅनेजर, कुपवाड अर्बन को.ऑप.बँक लि.,
कुपवाड, ता. मिरज, जि. सांगली

| अपील क्र. | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याच्या आदेशाची तारीख |
|---|---|---|---|---|
| ६५ / सांगली | ७.७.२००६ | २७.७.२००६ | ३१.७.२००६ | २३.८.२००६ |
| ६६ / सांगली | १२.७.२००६ | २७.७.२००६ | ३१.७.२००६ | २३.८.२००६ |

अपील क्र. ६५+६६/ सांगली

**<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**

सांगली येथील 'प्रतिध्वनी' या स्थानिक वृतपत्रातील अंकात सि.स.नंबर ६२५४/अ या मिळकती संबंधात आलेल्या नोटिशीच्या अनुषंगाने कागदपत्रे

## विवेचन

अपीलकर्ता श्री. जाविद गणी बागवान यांनी सांगली येथील वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या नोटिशीबाबतची माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी याच्यांकडील माहितीने समाधान न झाल्याने श्री. बागवान यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे.

आयोगाकडे प्राप्त झालेल्या अपिलांच्या अनुषंगाने आयोगाने दि. ९.१०.२००७ रोजीच्या पत्रान्वये सर्व संबंधितांना विचारणा केली होती. सदर मिळकत जागेचा वाद आता मिटला असल्याने आपली अपिले निकाली काढण्यात यावी, असे श्री. बागवान यांनी दि. १३.११.२००७ च्या पत्रान्वये आयोगास कळविले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे**

**पुणे**
**दि. ११.२.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. किशोरीलाल गोंविदराम बिहाणी
बिल्डिंग क्र.अे-३, फ्लॅट नं.२८, कुनाल इस्टेट,
केशवनगर, चिंचवडगाव, पुणे-३३ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक,
नगरपरिषद प्रशासन, नाशिक विभाग, नाशिक — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
मुख्याधिकारी, नगरपरिषद राहुरी,
जि. अहमदनगर -४१३ ७०५

| अ.क्र | अपील क्रमांक | ८१८ / पुणे |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | १०.१२.२००५ |
| २ | जा माहिती अधिका-याो उत्तर दिल्याची तारीख | २७.१२.२००५ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | १७.७.२००६ |
| ४ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | २१.८.२००६ |

**मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

नगर परिषद, राहुरी बुद्रुक, वॉर्ड क्रमांक ३०, घर नंबर २९२ या मिळकतीचा उतारा, पूर्वीचा गट क्रमांक, फेरफार उतारे, वारस दाखले, मृत्युपत्र इत्यादी बाबत माहिती

## विवेचन

अपीलकर्ता श्री. किशोरीलाल गोंविदराम बिहाणी यांनी राहुरी नगरपरिषदेकडे वॉर्ड क्रमांक ३०, घर क्रमांक २९२ या मिळकतीच्या अनुषंगाने माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी व अपीलीय प्राधिकारी याच्यांकडील माहितीने समाधान न झाल्याने श्री. बिहाणी यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे.

आयोगाकडे प्राप्त झालेल्या अपिलांच्या अनुषंगाने आयोगाने दि. २२.११.२००७ रोजीच्या पत्रान्वये सर्व संबंधितांना विचारणा केली होती. संदर्भित अपिलाच्या अनुषंगाने माहिती मिळाली असल्याने हे अपील मागे घेत असल्याचे अपिलकर्त्याने दि. २९.१.२००८ रोजीच्या पत्रान्वये आयोगास कळविले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ११.२.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे

(विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे

राज्य माहिती आयोग, पुणे विभाग, पुणे

क्र.अपील/पुणे/ ८६०/२००७
राज्य माहिती आयुक्त कार्यालय, पुणे विभाग,
पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
फोन क्र. २६०५०५८०/२६०५०६३२/३३
दिनांक : ८/२/२००८.

प्रति,

श्री. सुनिल नारायण बोबडे,
श्रीराम दालमील जवळ,
मु.पो.नवी वस्ती, बडनेरा, ता. जि.अमरावती,

विषय : ग्रॅच्युटी व पेन्शन मिळणेबाबत आपले व्दितीय अपील दि.२५/१/२००७.

संदर्भ : आपले पत्र दिनांक ४/१२/२००७.

महोदय,

आपले विषयाधीन व्दितीय अपीलाची तपासणी केली असता प्रस्तुत अपीलाचा विषय आयोगाच्या कक्षेतील नाही. यास्तव आपले अपील निकाली काढण्यात आले आहे. असे आपणास कळविण्याचे मा.राज्य माहिती आयुक्त, पुणे यांचे मला निर्देश आहेत.

आपला,

(रा.म.गेंगजे)
कक्षअधिकारी
राज्य माहिती आयोग
पुणे विभाग, पुणे

प्रत : १. प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहायक संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण , प्रादेशिक कार्यालय, पुणे-५
२. जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रशिक्षणार्थी सल्लागार, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण , प्रादेशिक कार्यालय, पुणे-५
यांना माहितीस्तव सादर

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.रविंद्र किसन राऊत
रा.फरांदवाडी, पो.फलटण, ता.फलटण, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी, वर्ग-१,
पंचायत समिती, फलटण, जि.सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा गट शिक्षणाधिकारी,
पंचायत समिती फलटण, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९१+१०७ / सातारा /२००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १३.९.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.रविंद्र किसन राऊत
रा.फरांदवाडी, पो.फलटण, ता.फलटण, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी, वर्ग-१,
पंचायत समिती, फलटण, जि.सातारा श्री.एम.एस.घुले

**जन माहिती अधिकारी** तथा गट शिक्षणाधिकारी,
पंचायत समिती फलटण, जि.सातारा श्री.गजानन मुरलीधर गनबावले

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १५.५.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ५.६.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २९.६.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १७.७.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>फलटण तालुक्यातील जिल्हा परिषद शाळामधील काही शिक्षकांच्या बदल्या तोंडी आदेशाने केल्या व नंतर रद्दही केल्या. या सर्व शिक्षकांची नांवे, पत्ते, मूळ शाळा व बदली केलेले ठिकाण याची संपूर्ण यादी. बदल्यांच्या कारणांसह. | |

## विवेचन

फलटण तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील शिक्षकांच्या बदल्यांच्या संदर्भात गटविकास अधिकाऱ्यांनी दिलेल्या नोटिशीच्या अनुषंगाने आपण केलेल्या अर्जावरील कार्यवाहीबाबतची माहिती मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.रविंद्र किसन राऊत यांनी जन माहिती अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती फलटण यांच्याकडे केली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित मुदतीत श्री.राऊत यांना शुल्क कळविले व माहिती पाठविली. परंतु चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिल्याच्या कारणावरुन श्री.राऊत यांनी अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, वर्ग-१, पंचायत समिती, फलटण यांच्याकडे अपील केले. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी श्री.राऊत यांना आवश्यक असलेली माहिती देण्याचा आदेश दिला. श्री.राऊत ही माहिती व्यक्तिशः घेऊन जाणार, असे अपिलाच्या सुनावणीच्या वेळी ठरले असतानाही त्यांनी ती माहिती नेली नाही. म्हणून जन माहिती अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, फलटण श्री.गजानन मुरलीधर गनबावले यांनी श्री.राऊत यांना माहिती घरपोच दिली. परंतु दरम्यानच्या काळात गटविकास अधिकाऱ्यांनी निर्णय न दिल्याचे कारण नमूद करुन श्री.राऊत यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.जगदाळे यांना देण्याच्या सूचना प्रशासकांना देण्यात आल्या, असे अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, सातारा श्री.के.बी.जेबले यांनी लेखी व तोंडी नमूद केले.

'नियमांचा अर्थ आपल्या सोयीप्रमाणे लावणाऱ्या अधिकाऱ्यांच्या बुध्दीची किव करावी लागेल,' 'निष्कर्ष सहाय्यक निबंधकांच्या बौध्दिक दिवाळखोरीचे द्योतक आहे,' अशा स्वरुपाची भाषा अपीलकर्त्याने वापरली आहे. ती योग्य नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य.

(२) अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, सातारा यांनी संस्थेवरील प्रशासकाकडून अपीलकर्त्यास ऊर्वरित माहिती दिली गेल्याचा पूर्तता अहवाल दि.२०.२.२००८ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**पुणे.**
**दि.७/२/२००८**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**